अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# तुम्ही जा मतदानाला आम्ही जातो पर्यटनाला

ऐन उन्हाळ्याच्या सुट्टीत आलेली लोकसभा निवडणुकीच्या मतदानाची तारीख लोकांमध्ये संभ्रम निर्माण करणारी ठरली आहे. मतदानासाठी थांबावे की, त्या दिवसाच्या सुट्टीचा फायदा घेऊन प्रवासाला जावे. असे लोकांच्या मनामध्ये प्रश्न निमर्ाण झाले आहेत.परंतु गेल्या आठवड्यापर्यंतची रेल्वे आरक्षणाची परिस्थिती पाहिली आणि वेगवेगळ्या पर्यटन संस्थांकडच्या नोंदणीवर नजर टाकली. तर बहुतांश मतदार हे मतदानाकडे पाठ फिरवून सुट्टीचा आनंद घेण्याच्या मुडमध्ये असल्याचे दिसते. त्यातही दरवर्षी न चुकता सुट्टीच्या काळात प्रवासाला जाणाऱ्या मुंबईकरांची संख्यादेखील थोडीथोडकी नसते. परप्रांतातून आलेल्यांनी तर आपल्या ठरल्या वेळापत्रकाप्रमाणे आरक्षणे केली आहेत. याचा अर्थ गावाला जाणाऱ्यांच्या संख्येमध्ये निवडणुकांमुळे कोणतीही कपात झालेली नाही. उलट अनेक पर्यटन संस्थांनी सुट्टीचा हा माहोल लक्षात घेऊन भरघोस सवलत दिली आहे. या महिन्यातच बुकिंग करणाऱ्यांना जवळपास पन्नास टक्के डिस्काऊंट देण्याचे आकर्षण दाखवल्यामुळे अगदी उच्चशिक्षित आणि ज्यांच्याकडे बऱ्यापैकी पैसा आहे असा उच्चभ्रू वर्गसुध्दा निवडणुकीपेक्षा त्या काळामध्ये फिरस्तीला महत्त्व देताना दिसतो. ही गोष्ट लक्षात घेऊनच राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त संपत यांनीदेखील लोकांमधल्या मतदानाविषयीच्या उदासीनतेबद्दल खंत व्यक्त केली आहे. निवडणूक प्रचारामध्ये राजकीय पक्ष सगळ्या तयारीनिशी उतरले असताना मतदारच राजकीय पक्षांच्या आवाहनाला पाहिजे तसा प्रतिसाद देत नसतील तर लोकशाहीच्यादृष्टीने ही बाब निश्चितच चिंताजनक ठरते. जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीवादी देशामध्ये मतदानाच्या संदर्भामध्ये अशा प्रकारचा एकाअर्थी निष्काळजीपणा असावा ही गोष्टदेखील विचार करायला लावणारी आहे. आपल्या मतदानामधून आपल्या देशाचा कारभार पाहणारे सरकार नक्की होणार असते. त्या मताचे मूल्य समजून घेतले पाहिजे. कदाचित लोकांना मतदानाला जाण्याची इच्छा असूनही नाइलाजाने त्याकडे पाठ फिरवण्याची वेळ येत असावी. परंतु त्यांच्या मनामध्ये ही उदासीनता का निर्माण होते मतदानापेक्षा ते पर्यटनाला का महत्त्व देतात. एवढ्या मोठ्या राष्ट्रीय महत्व असलेल्या गोष्टीकडे ते गंभीरतेने का पाहात नाहीत याचा शोध घेतला पाहिजे. त्यांच्यातल्या या निष्काळजीपणाची किंवा उदासीनतेची कारणे शोधली पाहिजेत.

### सगळे पक्ष सारखेच

प्रामुख्याने महाराष्ट्रातल्या शहरी भागातले मतदार मतदानाकडे पाठ फिरवतात असा आतापर्यंतचा अनुभव आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वात मोठे शहरीकरण किंवा नागरीकरण झालेले राज्य मानले जाते. ग्रामीण भागाइतकीच मतदारांची संख्या शहरी भागातही आहे. परंतु हाच मध्यमवर्गीय किंवा सुशिक्षित वर्ग मतदानाच्याबाबतीत फारसा उत्साही दिसून येत नाही. गेल्या तीन चार निवडणुकांचा आढावा घेतला तर महाराष्ट्रातल्या कोणत्याही शहरी भागातले मतदान पन्नास ते पंचावन्न टक्क्यांच्यावर झालेले दिसत नाही. त्यातही चाळी आणि झोपडपट्ट्यांमधले मतदार मतदानाला जातात. मात्र मोठमोठ्या इमारतींमध्ये राहणारे किंवा ज्यांना उच्च मध्यमवर्गीय लोक एकतर या दिवशी कुठेतरी शहराबाहेर निघून जातात किंवा शहरात असूनही मतदानाला जात नाहीत. त्या तुलनेने ग्रामीण भागातले मतदान समाधानकारक होते. गावाचा परिसर जवळच असलेले मतदान केंद्र गावपातळीवरचे सामाजिक आणि राजकीय वातावरण एकमेकांशी असलेले संबंध स्थानिक जातीय समीकरणे अशा अनेक कारणांमुळे गावाकडचा मतदार मतदानाच्या दिवशी बाहेरगावी जाणेसुध्दा टाळतो.शहरांमध्ये मात्र त्याच्याविरुध्द परिस्थिती दिसते. आज मतदारांमध्ये असलेल्या या उदासीनतेमुळे राजकीय पक्षांनादेखील फटका बसतो. मध्यंतरी तर जगातल्या काही देशांत मतदान सक्तीचे केले गेले होते.तसा प्रकार भारतातही करावा असा विचार मांडला गेला होता. कारण सातत्याने मतदानाची टक्केवारी घसरताना दिसून येते किंवा ती अगदी जाऊन जाऊन साठ ते पासष्ट टक्क्यापर्यंतच पोहचते. शंभर टक्के मतदान तर दूरच राहिले परंतु ते सत्तर टक्क्यापर्यंतसुध्दा पोहचत नाही. सरासरी मतदानाचा विचार केला तर ते पन्नास ते पंचावन्न टक्क्याच्याच आसपास घुटमळताना दिसते. म्हणजे जवळपास चाळीस टक्के मतदार सरकार निवडण्याच्या प्रक्रियेपासून अलिप्त असतो. ही गोष्ट निश्चितच एकाअर्थी धक्कादायक ठरते. लोकांमध्ये असलेली ही उदासीनता सध्याच्या राजकीय पक्षांच्या आणि त्यांच्या नेत्यांच्या व्यवहारामुळे निर्माण झालेली आहे. कोणताही राजकारणी किंवा राजकीय पक्ष विश्वास ठेवण्याच्या लायकीचा नाही. केवळ सत्ता हडपण्यासाठी आणि खुर्च्या बळकावण्यासाठी ही मंडळी हपापलेली असतात आणि निवडून आल्यावर ते याच मतदारांकडे दुर्लक्ष करतात एवढेच नव्हे तर सामान्य माणसाच्या दैनंदिन गरजासुध्दा ते पूर्ण करू शकत नाहीत.ज्यांना जनतेविषयीच जिव्हाळा नाही त्यांच्यासाठी आपण मतदानाचा कळवळा का दाखवायचा. असा त्यांचा मुलभूत प्रश्न असतो. अशा मन:स्थितीतूनच त्यांच्यामध्ये मतदानाविषयी निष्काळजीपणा वाढत चालल्याचे स्पष्टपणे दिसते.

### राजकीय पक्षच जबाबदार

यावेळच्या लोकसभा निवडणुकीत आरपारची लढाई असल्याचे चित्र निर्माण केले जात आहे. सतत दहा वर्षे सत्तेत असलेल्या काँग्रेसला बदलून नव्या पक्षांना संधी मिळेल असे वातावरण निर्माण होत आहे. परंतु त्याचवेळी जर मतदारांमध्ये मतदानाविषयी उत्सुकता नसेल तर या आरपारच्या लढाईला काही अर्थच उरत नाही. सगळे राजकीय पक्ष सारख्याच लायकीचे आहेत. असा पक्का समज लोकांमध्ये दिसून येतो. कोणालाही निवडून दिले तरी महागाई कमी होणार नाही किंवा भ्रष्टाचार संपणार नाही त्यापेक्षा या देशाचा कारभार भगवानभरोसेच सोडलेला बरा. असा निर्वाणीचा विचार मतदार करताना दिसतात. या भूमिकेतूनच तुम्ही जा मतदानाला आम्ही जातो पर्यटनाला असा संदेशच अनेक मतदारांनी राजकीय पक्षांना दिलेला दिसून येतो. मात्र या परिस्थितीचा राजकीय पक्षांनाच सामना करावा लागेल. त्यांनी स्वत:विषयी गमावलेली विश्वासार्हता पुन्हा कमवावी लागेल. देशाच्या भवितव्यासाठी लोकांनी आपल्याला मतदान केले पाहिजे अशा प्रकारची भावना राजकीय पक्षांना स्थापित करावी लागेल. तरच मतदानातला उत्साह वाढेल.